देशोन्नती
नागपूर दर्पण



# महिलांच्या प्रगतीसाठी सामाजिक सहकार्य आवश्यक : स्मृती इराणी



सत्कार समारंभात अभिनेत्री, भाजपा नेत्या स्मृती मल्होत्रा-इराणी

## वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉक्टरांचा सत्कार

*प्रतिनिधी / ६ फेब्रुवारी*

नागपूर : पूर्वी शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांत महिला मागेच होत्या. ३३ टक्के आरक्षणामुळे त्या प्रवाहात आल्या. आता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या काम करीत आहेत. महिलांना पुरेपुर संधी मिळाल्यास त्या वेगवेगळ्या क्षेत्रात आपला निश्चितच ठसा उमटवू शकतात. आज महिला शिक्षणातून पुढे जात असल्याने ३३ टक्के आरक्षणाची गरज नाही. पण तरीसुद्धा महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आरक्षणाची गरज असल्याचे सांगून महिलांच्या प्रगतीसाठी सामाजिक सहकार्याचीही तेवढीच आवश्यकता आहे, अशी भूमिका सुप्रसिद्ध टी.व्ही. अभिनेत्री, भाजपा नेत्या व सामाजिक कार्यकर्त्या स्मृती मल्होत्रा-इराणी यांनी येथे मांडली.

स्त्रीरोग व प्रसूती संस्थेच्या वतीने आज सायंकाळी आयएमए सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी व 'महिलांच्या ३३ टक्के आरक्षणाचा समाजावर होणारा परिणाम' या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर डॉ. सुब्रजित दासगुप्ता, संस्थेच्या अध्यक्षा सुनीता घिके, सचिव चैतन्य शेंबेकर उपस्थित होते. स्मृती इराणी पुढे म्हणाल्या, अजूनही महिलांना आवश्यक व योग्य सुविधा मिळत नाहीत. ग्रामीण भागात महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सुविधा नसल्याने महिला पुढे येऊ शकत नाहीत. महिलांना संधी मिळणे गरजेचे असून त्यासाठी समाजाच्या सहकार्याची आवश्यकता आहे. महिला प्रेम अन् आदर या गोष्टींच्या भूकेल्या असल्याचे सांगून त्या म्हणाल्या, महिलांनी स्वतःच्या विकासासाठी वडील, भाऊ, नवऱ्यावर अवलंबून राहू नये. सध्याच्या सुशिक्षित महिलांना आरक्षणाची गरज नसली तरी प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी आरक्षण हवेच, असेही इराणी यांनी ठामपणे सांगितले. यावेळी डॉ. अनुराधा रिधोरकर यांनी स्मृती इराणी यांची छोटेखानी मुलाखत घेतली. या मुलाखतीत भ्रुणहत्येविषयी विचारलेल्या प्रश्नावर इराणी म्हणाल्या, इतरांवर दोषारोपण करणे खूप सोपे असते. आईने हिंमत केली म्हणून मी जन्माला आले. खरं तर स्त्रीभ्रुणहत्येविरोधात आईनेच सुरुवात करावी. कारण तिच्या पोटात मूल असते, असे त्यांनी स्पष्ट करून सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. अशोक आढाव, डॉ. किशोर टावरी, डॉ. अशोक गुप्ता, डॉ. लीला अनेगावंडीकर, डॉ. आशा देशपांडे, डॉ. कमल देशमुख, डॉ. निर्मला मोकदम, डॉ. मंगला मुळीक, डॉ. सुमती रिधोरकर, डॉ. फिरोझा समाद, डॉ. कमल शास्त्रीकर, डॉ. सुमन सुभेदार, डॉ. मंजुळा रोहतगी, डॉ. नलिनी तोरणे, डॉ. श्याम बाभूळकर व डॉ. सुब्रजित दासगुप्ता यांचा शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन स्मृती इराणी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी सुनीता घिके यांनी संस्थेविषयी माहिती दिली. डॉ. दासगुप्ता यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पद्मश्री डॉ. बी. एस. चौबे व डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचा संदेश वाचून दाखविण्यात आला.

### स्मृतीने प्रेक्षकांत जाऊन केला डॉ. खान यांचा सत्कार

वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. शकीला खान यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया झाल्याने त्या मागेच प्रेक्षकांत बसल्या होत्या. त्यांचे नाव आयोजकांनी उच्चारल्यानंतर त्या सत्कार स्वीकारण्यासाठी स्टेजवर आल्या नाहीत. पण त्या मागे बसल्या असल्याचे कळताच स्मृती इराणी स्वतः स्टेजखाली उतरून प्रेक्षकांत सर्वात मागे बसलेल्या डॉ. खान यांच्या जवळ जाऊन इराणी यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी इराणी म्हणाल्या, 'एक औरत का यही जज्बा है जो उन्हे यहाँतक खिंचके लाया.'